मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» शनिवार, दि. 18 ऑक्टोबर 2025 | पान- 1

# महापालिकेच्या वतीने ‘दुर्गोत्सव 2025’ स्पर्धेचे आयोजन

## युनेस्कोकडून किल्ल्यांना मिळालेल्या जागतिक सन्मानाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी दिवाळी काळात राज्यभरात किल्ल्यांची उभारणी केली जाते. या परंपरेतून बालकांपासून प्रौढांपर्यंत सर्वांमध्ये इतिहास, शौर्य आणि संस्कृतीची जाणीव निर्माण होते. यंदा या पारंपरिक उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, कारण युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्रातील ११ ऐतिहासिक किल्ल्यांचा आणि तामिळनाडूतील १ किल्ल्याचा अशा एकूण १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला आहे. हा सन्मान महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशासाठी अभिमानाचा क्षण ठरला असून, या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ‘दुर्गोत्सव २०२५’ या विशेष उपक्रमाचे आयोजन केले




> छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा हा आपला अभिमान आहे. ‘दुर्गोत्सव २०२५’ च्या माध्यमातून आपण या वारशांचे संवर्धन करत नव्या पिढीमध्ये इतिहासाबद्दल आदर आणि प्रेरणा निर्माण करूया. या सर्व उपक्रमांद्वारे नागरिकांमध्ये स्वाभिमान, राष्ट्रभक्ती आणि इतिहासप्रेमाची भावना दृढ करण्याचे उद्दिष्ट चिंचवड महानगरपालिकेने ठेवले आहे.
>
> **- श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

आहे.

राज्य शासनाच्या या उपक्रमाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील नागरिक, विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण व्हावा, तसेच पर्यावरणपूरक साहित्य वापरून किल्ल्यांची उभारणी व्हावी या उद्देशाने ‘दुर्गोत्सव’ ही संकल्पना यंदा राबविण्यात येत आहे.

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समाविष्ट झालेल्या किल्ल्यांपैकी एखाद्या किल्ल्याचे मॉडेल आपल्या घरात, अंगणात, बाल्कनीत किंवा सोसायटीच्या चौकात तयार करावे. तयार केलेल्या किल्ल्यांचे छायाचित्र काढून ते ‘दुर्गोत्सव २०२५’ साठी उपलब्ध करून दिलेल्या बारकोडद्वारे स्कॅन करून अपलोड करावे. निर्धारित कालावधीत अपलोड केलेल्या नोंदींच्या आधारे प्रत्येक सहभागीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या हस्ताक्षराचे सन्मानपत्र (E-CERTIFICATE) प्रदान करण्यात येईल.

---

# दिवाळीपूर्वी नव्या कार्यालयीन पद्धतीची अंमलबजावणी नको..

## ग्राहक सेवा व कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी ‘रीस्ट्रक्चरिंग’ प्रक्रिया दिवाळीनंतर लागू करा

**पिंपरी | प्रतिनीधी**

राज्यभरातील महावितरण कार्यालयांच्या पारंपरिक ‘सेक्शन’ या कार्यालयीन पद्धतीला बंद करून नव्या ‘रीस्ट्रक्चरिंग’ रचना पद्धतीची अंमलबजावणी करण्याचा निर्णय कंपनी प्रशासनाने घेतला आहे. मात्र, या नव्या पद्धतीची अंमलबजावणी दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात करणे हे ग्राहक व कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अव्यवहार्य ठरेल, असे स्पष्ट करून ही अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२५ नंतरच करावी, अशी मागणी करणारे निवेदन पुणे जिल्हा महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती सदस्य तथा चिंचवड विधानसभा शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी मुंबईस्थित महावितरण कंपनीचे संचालक (संचालन) सचिन तालेवार आणि संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांना सादर केले आहे.

निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, 'महावितरण कंपनीने राज्यभरात गेल्या ६५ वर्षांहून अधिक काळ चालत असलेली “सेक्शन” ही कार्यालयीन पद्धत बंद करून नवीन रचना पद्धतीचा निर्णय घेतला आहे. या नव्या पद्धतीचा हेतू प्रशासनात कार्यक्षमता व आधुनिकता आणणे हा असला तरी, या प्रक्रियेबद्दल ग्राहक आणि कर्मचाऱ्यांमध्ये अद्याप आवश्यक जनजागृती झालेली नाही. त्यातच दिवाळीसारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर अचानक अशी



रचना बदलल्यास कामकाजात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे.

निवेदनात पुढे स्पष्ट करण्यात आले आहे की, सणासुदीच्या काळात विजेसारख्या अत्यावश्यक सेवेत कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये, ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. नव्या पद्धतीनुसार एका अधिकाऱ्यावर चार सेक्शनचा भार येणार असून, एका व्यक्तीला इतकी मोठी जबाबदारी पार पाडणे अवघड ठरेल. परिणामी कामकाजाची गती मंदावेल आणि ग्राहकांना सेवा मिळण्यात विलंब होण्याची शक्यता आहे.

तसेच, नव्या रचनेनुसार बिले वाटप, वसुली, मीटर-कनेक्शन व देखभाल ही चार स्वतंत्र कामे स्वतंत्र जबाबदाऱ्यांमध्ये विभागली गेली आहेत. ही विभागणी प्रशासनासाठी सोयीची ठरू शकते, परंतु प्रत्यक्षात ग्राहकांच्या तक्रारी आणि मागण्या जलदगतीने सोडविणे अवघड जाईल. सध्याच्या पद्धतीत प्रत्येक सेक्शनमध्ये अभियंते आणि कर्मचारी स्थानिक ग्राहकांशी सतत संपर्कात असतात, त्यामुळे तात्काळ सेवा शक्य होते.

निवेदनात आणखी म्हटले आहे की, “पूर्वी प्रत्येक सबडिव्हिजनमध्ये चार अभियंते काम पाहत असत आणि त्यांच्याकडे स्वतंत्र शाखांची जबाबदारी असे. मात्र, नव्या पद्धतीत एका अधिकाऱ्यावरच सर्व शाखांचा भार टाकण्यात आला आहे, ज्यामुळे कामाचा ताण आणि जबाबदारी वाढणार आहे. हे केवळ कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर ग्राहकांनाही फटका देणारे ठरेल. त्यामुळेच ग्राहकांच्या हितासाठी तसेच कार्यक्षम आणि सुरळीत प्रशासनासाठी नव्या कार्यालयीन कामकाज पद्धतीची अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२५ नंतर करण्यात यावी. तोपर्यंत जुन्या ‘सेक्शन’ पद्धतीनुसार कामकाज सुरू ठेवण्यासाठी सर्व संबंधित विभागांना तातडीच्या सूचना देण्यात याव्यात,” असे या निवेदनात सौंदणकर यांनी म्हटले आहे.

# तळवडेसह औद्योगिक पट्ट्यातील वीज सक्षमीकरणासाठी “बुस्टर”

## नवीन उपकेंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा; आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळवडेसह लगतचा चाकण औद्योगिकपट्टा परिसरातील परिसरातील वीज समस्येवर तोडगा काढण्यासाठी आता नवीन वीज उपकेंद्र (स्विचिंग स्टेशन) उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) च्या कार्यक्षेत्रातील संबंधित जागा महावितरणकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

तळवडे भागात वाढती लोकसंख्या आणि वीजेची मागणी यामुळे देवी इंद्रायणी उपकेंद्रावर अतिरिक्त वीजभार पडला आहे. या उपकेंद्रावर भार वाढला आहे, त्यामुळे गेली 10 वर्षे वीज पुरवठा व्यवस्थेत अडचणी येत आहेत. 2018 मध्ये कॅनबे चौक येथे नवीन उपकेंद्र प्रस्तावित करण्यात




आले होते, पण जागेची समस्या असल्यामुळे कामाला प्रारंभ होऊ शकला नव्हता. याबाबत आमदार महेश लांडगे यांनी महावितरण, एमआयडीसी आणि उर्जा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.

तसेच, महावितरणचे व्यवस्थापक विश्वास पाठक यांच्यासोबत झालेल्या बैठकीत महेश लांडगे यांनी यावरील उपाययोजना प्रस्तावित केली होती. त्यानंतर, दि. 13 ऑक्टोबर 2025 रोजी MIDC ने सदर जागा MSEB ला हस्तांतरित केली आहे, ज्यामुळे नवीन उपकेंद्र उभारण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

> “पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासाठी वीज पुरवठा सक्षम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तळवडे भागातील वीज समस्येवर सातत्यपूर्ण पाठपुरावा करत, नवीन उपकेंद्र उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या उपकेंद्रामुळे वीज ग्राहकांना आणि उद्योजकांना सक्षम वीज पुरवठा मिळेल, असा विश्वास आहे. आम्ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली वीज समस्यांचा निराकरण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

आमदार लांडगे म्हणाले की, 2014 पासून आम्ही भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे मार्गी लावली. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यात येत आहेत. त्यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली असा “रेसिडेन्सिअल कॉरिडॉर” विकासित झाला. लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढली. त्याचसोबत वीज ग्राहक संख्याही वाढली. त्या तुलनेत वीज पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याची आवश्यकता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही भोसरी वीज उपकेंद्राचे विभाजनकरून चऱ्होली आणि दिघी उपकेंद्र निर्मिती करण्यात आली. इन्फ्रा- १ ची कामे पूर्ण झाली आहेत. इन्फ्रा- २ ची कामे प्रगतीपथावर आहेत.

---

# “जन की बात”मध्ये 590 तक्रारींची “ऑन द स्पॉट” सोडवणूक

## चिंचवड मतदारसंघात आमदार जगताप यांच्याकडून नागरिकांच्या तक्रारीचे निवारण

**पिंपरी | प्रतिनीधी**

चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून “जन की बात संवाद | सेवा | समर्पण” होत असलेल्या या विशेष कार्यक्रमात प्रभाग क्रमांक २२ व परिसरातील ५९० तक्रारींची ऑन द स्पॉट सोडवणूक करण्यात आली.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्र.२२ मधील नागरिकांसाठी आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून “जन की बात संवाद | सेवा | समर्पण” हा विशेष कार्यक्रम सुरु आहे. गुरुवार, दि.१६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी काळेवाडीतील ज्योतिबा मंगल कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांनी तक्रारींची सोडवणूक करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यामध्ये शासकीय योजना, जनसामान्यांच्या तक्रारी, शासकीय दाखले, महापालिकेशी संबंधित तक्रारी, वीज, पाणी, ड्रेनेज अशा विविध




प्रकारच्या तक्रारी आमदार शंकर जगताप यांनी या ५९० तक्रारींची तत्काळ सोडवणूक करण्यात केली.

यावेळी परसिरातील भाजपा मंडळ अध्यक्ष सोमनाथ तापकीर, माजी नगरसेवक सुरेश नढे, माजी नगरसेविका नीता पाडाळे, मा. नगरसेविका ज्योती भारती, मा. नगरसेवक प्रमोद ताम्हणकर, स्वीकृत ड प्रभाग सदस्य विनोद तापकीर, गोपाळ माळेकर, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, रमेश काळे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष कैलास सानप, उत्तर भारतीय आघाडी जिल्हाध्यक्ष आकाश भारती, मंडल अध्यक्ष चिंचवड काळेवाडी हर्षद नढे, भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मा. उप्पर तहसीलदार जयराज देशमुख, क्षेत्रीय अधिकारी राजाराम सरगर, पोलिस निरीक्षक राजेंद्र बहिरट, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुळे, चंद्रकांत मुठाल, डॉ विजय क्षीरसागर,राजेश बसावे, महेश बरीदे,दिलीप भोसले,किवण उंदुरे, विजय सोनवणे , सुदिप वाघमारे, अश्विनी गायकवाड, लक्ष्मीकांत कोल्हे आदी महानगरपालिका,

### दिवाळीनिमित्त पुरग्रस्तांना मदतीचे आवाहन

» भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून यावर्षीची दिवाळी राज्यातील ज्या भागात पुराचे संकट ओढावले. त्या भागातील नागरिकांसाठी मदत करून साजरी करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. पुरग्रस्त जिल्ह्यातील नागरिकांना आपण दिवाळीनिमित्त मदत करणार आहोत. त्याकरिता जास्तीत जास्त मदत करण्याचे आवाहन देखील या जन की बात कार्यक्रमाच्या माध्यमातून आमदार शंकर जगताप यांनी केले.

> “वाढत्या शहरीकरणामुळे नक्कीच वेगवेगळे प्रश्न वाढत आहेत. सामान्य नागरिकांकडून रस्ते, कचरा, पाणी, वीजेबाबतच्या तक्रारी असतात. त्यांच्या अशा तक्रारी कोणत्याही अधिका-यांनी प्रलंबित ठेवू नयेत. त्यांची तातडीने सोडवणूक करून नागरिकांना होणारा त्रास कमी करावा.
>
> **– शंकर जगताप, आमदार - चिंचवड विधानसभा मतदारसंघ**

महावितरण, पाणीपुरवठा विभाग, पोलीस आणि इतर शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

त्यावेळी आमदार शंकर जगताप उपस्थित महापालिका, तसेचे शासकीय अधिका-यांना नागरिकांच्या कोणत्याही तक्रारी प्रलंबित राहणार नाहीत, याची खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना केल्या आहेत. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून काम करणा-या सर्वांनी नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी कामाचा वेग असाच ठेवावा, असे आवाहनही पदाधिकारी, कार्यकर्त्यांना केले.

# वाघोलीत नवीन बांधकामांना परवानगी नकोच; महापालिका आयुक्त नवलकिशोर राम

## पीएमआरडीएने नवीन बांधकामांना परवानगी देऊ नये, असे राज्य सरकारला कळविणार असल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.

**पुणे | प्रतिनिधी**

वाघोली परिसरात रस्त्यांच्या समस्या, कचऱ्याची विल्हेवाट, तसेच मैलापाणी आणि सांडपाण्याची व्यवस्था, तसेच पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नाही असे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना बुधवारी (दि. १५) वाघोली परिसराची पाहणी केल्यानंतर दिसून आले. यामुळे या परिसरामध्ये पीएमआरडीएने नवीन बांधकामांना परवानगी देऊ नये, असे राज्य सरकारला कळविणार असल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.

आयुक्त नवलकिशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, या भागातील बांधकाम परवानगी, मूलभूत सुविधाच उपलब्ध नसताना दिल्या गेल्याचे आढळून आले आहे. या भागात सुविधा निर्माण करण्यासाठी अनेक अडचणी येऊ शकतात. यामुळे पुढील काळात बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये. मूलभूत सुविधाच उपलब्ध झाल्यानंतरच परवानगी दिली जावी, अशा आशयाचे पत्र पीएमआरडीएला पाठविण्यात येणार आहे."

महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी लोहगाव-रोड येथील सातववस्ती, वाघेश्वरनगर, बाईफ रोड, फुलमळा रोड, बकोरी रोड, आयव्ही इस्टेट परिसरातील समस्यांची पाहणी केली. यावेळी नागरिकांनी उपस्थितांनी तीव्र स्वरूपात समस्यांची मांडणी केली. यानंतर श्रेयस हॉल येथे आयोजित बैठकीत नागरिकांशी संवाद साधून महापालिका अधिकाऱ्यांना कामे पूर्ण करण्याबाबत कडक शब्दात सूचना दिल्या.

महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी यावेळी नागरिकांनी त्यांच्यासमोर गाऱ्हाणी मांडली. मागील काही वर्षात वाघोली परिसरात मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली आहेत. महापालिकेत समाविष्ट समाविष्ट होण्यापूर्वीपासून याठिकाणी पीएमआरडीए परवानगी देत आहे. विशेष असे की, पीएमआरडीएने मोठ्या सोसायट्यांना परवानगी देताना ड्रेनेज लाईनऐवजी एसटीपी उभारणे बंधनकारक केले. परंतु, या सोसायट्यांना एसटीपीतून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर कशासाठी करायचा आणि उर्वरित पाण्याचे काय करायचे याचेच नियोजन नसल्याने या सोसायट्यांतून पाणी मोकळ्या भागात सोडण्यात येत आहे. यामुळे आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.




### सर्व कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार

» जिल्हाधिकारी म्हणून पुण्यात काम केले आहे. त्यामुळे वाघोलीतील सर्व समस्या मला माहिती होत्या. महापालिकेत वाघोलीचा समावेश केल्यानंतर या समस्यांचे निराकरण होईल अशी आशा होती, मात्र महापालिकेत समावेश होऊन आजही वाघोलीच्या समस्या कायम आहेत. वाघोलीतील नागरिक ड्रेनेज, पाणी, रस्त्याच्या ज्या समस्या सहन करीत आहेत त्या त्रासाची मला जाणीव आहे, विहित कालावधीत रखडलेली कामे, इतर कामे करण्याबायत माझ्या स्तरावर पूर्ण करेल. अधिकारी काम करत नसेल तर त्यांच्यावर कारवाई करणार, पुढच्या पाहणी दौऱ्यावेळी बहुतांश कामे पूर्ण झालेली असतील. असे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी सांगितले.

### बांधकाम परवानगी महापालिकेकडेच हवी

» महापालिका हद्दीत समाविष्ट असलेल्या गावांतील बांधकामांना पीएमआरडीएकडून परवानगी दिली जात आहे. वास्तविक या समाविष्ट गावांचा विकास आराखडा अद्याप मंजूर झालेला नाही. पीएमआरडीएने केलेला विकास आराखडाच राज्य सरकारने नामंजूर केला आहे. यामुळे याभागातील मुलभुत आणि नागरी सुविधा उपलब्ध करण्यात अडचण येत आहे.

> पुणे शहरातील इतर भागांपेक्षा वाघोली हा परिसर अतिशय अस्वच्छ आहे. या भागात पायाभूत सुविधांचा विकास करणे गरजेचे आहे. पाण्याची सुविधा नाही, ड्रेनेज लाईन नाही त्यानंतर मोठ- मोठ्या सोसायट्या उभारण्यात आलेल्या आहेत. मोठ्या सोसायट्यांतील सांडपाण्याचा प्रश्न गंभीर आहे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे. पायाभूत सुवधांचा विचार करुनच बांधकामे झाली पाहिजेत. त्यामुळे राज्य सरकारला आणि पीएमआरडीएला वाघोली परिसरात बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये, असे पत्र लिहिणार आहे.
>
> **- नवलकिशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका**

# पीएमआरडीएचा डीपी रद्द झाल्यानंतर विकास कामे प्रलंबित

## आराखडा रद्द झाल्यानंतर हद्दीचा स्ट्रक्चरल प्लॅन तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असा प्रस्ताव प्राधिकरणाने राज्य शासनाकडे पाठविला.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील रचनात्मक आराखडा (स्ट्रक्चरल प्लॅन) तयार करण्यासाठी नगररचना विभागातील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. अद्याप राज्य शासनाकडून मान्यता मिळाली नसल्याने प्राधिकरणाच्या हद्दीतील रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात विलंब होत असून, त्याचा अप्रत्यक्ष ताण पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील वाहतुकीवर पडत आहे.

प्राधिकरणाने सुमारे सात हजार चौरस किलोमीटर लांबीच्या हद्दीचा प्रारूप विकास आराखडा (डीपी) तयार करण्यात आला होता. परंतु चुकीचे आरक्षण, हस्तक्षेप यांबाबत तक्रारी होत न्यायालयात तक्रारी झाल्याने राज्य शासनाने मार्च महिन्यातच विकास आराखडा रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पायभूत सुविधांच्या अनुषंगाने यापुढील काळातील विकास आराखडा तयार करण्यापूर्वी प्राधिकरणाने हद्दीचा स्ट्रक्चरल प्लॅन तयार करावा, असा निर्णय घेऊन प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने सूचना दिल्या.

त्यासाठी मक्तेदारी आणि प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहार कायद्यामध्येही (एमआरटीपी ॲक्ट) राज्य शासनाकडून बदल करण्यात आले. कायद्यातील हा बदल करताना स्ट्रक्चरल प्लॅन करण्याची जबाबदारी ही नगररचना विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करून करावा, अशी तरतूद करण्यात आली.

आराखडा रद्द झाल्यानंतर हद्दीचा स्ट्रक्चरल प्लॅन तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असा प्रस्ताव प्राधिकरणाने राज्य शासनाकडे पाठविला. मात्र, अद्याप या प्रस्तावास शासनाकडून मान्यता मिळालेली नाही. अधिकाऱ्यांची नेमणूक न झाल्यामुळे स्ट्रक्चरल प्लॅनचे काम थांबले आहे. स्ट्रक्चरल प्लॅन तयार होत नाही, तोपर्यंत प्राधिकरणाला विकास आराखड्याचे काम हाती घेत येत नसल्याची बाबही समोर आली आहे. या स्ट्रक्चरल प्लॅनच्या माध्यमातून प्राधिकरणाच्या हद्दीत रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून पुणे, पिंपरी-चिंचवड या दोन्ही महापालिका आणि त्यांच्या लगतच्या भागातील वाहतुकीची कोंडी फोडण्याची नियोजन करण्यात येणार आहे.




> प्रारूप विकास आराखडा रद्द झाल्यानंतर स्ट्रक्चरल प्लॅन तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, असा प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. लवकरच त्यास मान्यता मिळून अधिकाऱ्यांची नियुक्ती होईल.
>
> **- डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए**

# नव्या एसटी बस आल्या, पण चालक नाहीत! सणासुदीत प्रवाशांची मोठी गैरसोय

## महाराष्ट्र राज्य महामार्ग परिवहन महामंडळाने गेल्या काही महिन्यांत नवीन एसटी गाड्या मोठ्या प्रमाणात विविध आगारांना दिल्या.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात दळणवळणाचा मुख्य आधार असलेले महाराष्ट्र राज्य महामार्ग परिवहन महामंडळाने गेल्या काही महिन्यांत नवीन एसटी गाड्या मोठ्या प्रमाणात विविध आगारांना दिल्या. मात्र, चालक आणि वाहकांची संख्या पुरेशी नसल्यामुळे अनेक एसटी गाड्या अगदी अस्तित्वात असतानाही तशा रस्त्यावर निघू शकत नाहीत.एसटी गाड्या आहेत.परंतु चालक-वाहकांची मोठी कमतरता असल्याने भविष्यात येणारे महत्त्वाचे सण यामध्ये प्रवाशांची मोठी गैरसोय होणार आहे.



> “नवीन एसटी गाड्या आहेत.परंतु चालक-वाहक पुरेश्या प्रमाणात नाही. दिवाळीत प्रवाशांना गैरसोय होणार आहे. चालक-वाहकांची विश्रांती, वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे.अतिरिक्त कामामुळे अपघात होण्याची भीती आहे.”
>
> **- संजय पवळे,सरपंच, पेठ.**

> “एसटी गाडीची संख्या वाढली आहे हे छान आहे. पण तशी गाडी रस्त्यावर उतरली पाहिजे. चालकवाहक भरती केवळ घोषणेत न रहावी.सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची गर्दी वाढते; सेवा कायम राहिली पाहिजे.यासाठी महामंडळे प्रयत्न करावे.”
>
> **- प्रवीण मोरडे,उद्योजक, मंचर..**

चालक-वाहकांच्या मोठ्या कमतरतामुळे मनाविरुद्ध वरिष्ठांच्या आदेशांनुसार अतिरिक्त फेऱ्या, जास्त वेळ काम करावे लागल्याने चालक-वाहकांची मानसिकता बिघडत असून त्यांनी ताण,थकवा देखील व्यक्त केला आहे. पुणे विभागात उदाहरणार्थ, कोविडपूर्वी १,१०० एसटी गाड्या होत्या. परंतु सध्या फक्त ८५० एसटी गाड्या उपयुक्त स्थितीत आहेत. या विभागाला सुमारे २०० वाहकांची अंदाजे सद्यस्थितीत गरज असल्याचे सांगण्यात आले.

राज्यातील एकूण एसटी गाड्यांची संख्या अंदाजे सुमारे १५ हजार ५०० ते १६ हजार दरम्यान असून जवळपास अंदाजे ३ हजार एसटी चालक-वाहकांची कमतरता असल्याचे समोर आले आहे. गेल्या ३ महिन्यांपासून राज्यातील एसटी आगारांना नवीन एसटी गाड्या वितरित झाल्या.परंतु वाहकांची मोठी कमतरता आहे. दिवाळी उत्सव आहेत; सुट्ट्या लागणार आहेत, प्रवाशांची गर्दी वाढणार आहे.अशी वेळ जर चालक-वाहक वाढीव फेऱ्या करू शकणार नाहीत, तर सेवा व्यत्ययित होण्याची भीती आहे.

महाराष्ट्र राज्य महामार्ग परिवहन महामंडळाने गेल्या काही महिन्यांत नवीन एसटी गाड्या मोठ्या प्रमाणात विविध आगारांना दिल्या. मात्र, चालक आणि वाहकांची संख्या पुरेशी नसल्यामुळे अनेक एसटी गाड्या अगदी अस्तित्वात असतानाही तशा रस्त्यावर निघू शकत नाहीत.एसटी गाड्या आहेत. परंतु चालक-वाहकांची मोठी कमतरता असल्याने भविष्यात येणारे महत्त्वाचे सण यामध्ये प्रवाशांची मोठी गैरसोय होणार आहे. अंदाजे ३ हजार एसटी चालक-वाहकांची कमतरता असल्याचे समोर आले आहे. गेल्या ३ महिन्यांपासून राज्यातील एसटी आगारांना नवीन एसटी गाड्या वितरित झाल्या.परंतु वाहकांची मोठी कमतरता आहे.दिवाळी उत्सव आहेत; सुट्ट्या लागणार आहेत, प्रवाशांची गर्दी वाढणार आहे. अशी वेळ जर चालक-वाहक वाढीव फेऱ्या करू शकणार नाहीत, तर सेवा व्यत्ययित होण्याची भीती आहे.

आठ तास ड्रायव्हर काम करतात, त्यानंतर विश्रांतीची गरज असते, पण सध्या ताण अधिक असल्यामुळे त्यांचे आरोग्य आणि सुरक्षा दोन्ही धोक्यात येत आहेत. विभागवार चालक-वाहकांची मोठी गरज आहे.सध्या एसटी चालक-वाहकांची भरती नाही.करारावरच्या किंवा तात्पुरत्या चालक-वाहकांना कामावर घेण्याचा मार्ग एसटीने अवलंबिला असला तरी तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.एसटी गाड्या असून पण चालक-वाहक नसल्यामुळे त्या आगारात उभ्या आहेत.

# जेजुरी नगरपालिका! स्थानिक समीकरणे बदलणार ; कोण कोणाशी हातमिळवणी करणार याकडे लक्ष

## आळंदी नगरपरिषदेच्या रणांगणात राष्ट्रवादीची रणतयारी ; नगरपरिषद निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे - दिलीप मोहिते पाटील

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात सध्या महायुतीचे सरकार आहे. मात्र, आपण वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून योग्य रणनीती आखूया. पक्षाची संघटनशक्ती मजबूत आहे, त्यामुळे प्रत्येकाने आपल्या प्रभागात जनसंपर्क वाढवावा आणि निवडणुकीसाठी सज्ज राहावे असे आवाहन माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केले.आगामी आळंदी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या तयारीला वेग दिला आहे. फ्रूटवाले धर्मशाळा येथे झालेल्या आढावा बैठकीत खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी उपस्थित पदाधिकारी व इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन केले.



### चर्चेतून निर्णय घेऊ

» स्थानिक पातळीवर महायुतीसोबत सन्मानाची वागणूक मिळाल्यास चर्चेतून निर्णय घेऊ; अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे स्वतःच्या बळावर नगरपरिषद जिंकण्याची ताकद आहे. बैठकीत सुकाणू समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यात पक्षाचा निरीक्षकही सहभागी असणार आहे. ही समिती इच्छुक उमेदवारांची पडताळणी करून योग्य उमेदवारांची निवड करणार आहे.

यावेळी तालुकाध्यक्ष कैलास सांडभोर, निर्मलाताई पानसरे, अरुण चांभारे, डी. डी. भोसले पाटील, विलास कुऱ्हाडे, नंदकुमार कुऱ्हाडे, प्रकाश कुऱ्हाडे, प्रदीप बवले, सचिन घुंडरे, श्रीधर कुऱ्हाडे, पुष्पाताई कुऱ्हाडे, रुपाली पानसरे, सौरभ गव्हाणे, निसार सय्यद, संदेश तापकीर, आनंद रनदिवे तसेच आळंदी शहरातील असंख्य इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.यानंतर पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी पक्ष कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले की, इच्छुकांनी आपल्या प्रभागांमध्ये नियमित भेटीगाठी सुरू कराव्यात, दिवाळीच्या शुभेच्छा देत मतदारांशी संवाद साधावा.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे स्वतःच्या बळावर नगरपरिषद जिंकण्याची ताकद आहे. बैठकीत सुकाणू समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यात पक्षाचा निरीक्षकही सहभागी असणार आहे. ही समिती इच्छुक उमेदवारांची पडताळणी करून योग्य उमेदवारांची निवड करणार आहे. या बैठकीमुळे आळंदीत राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, नगरपरिषद निवडणुकीच्या तयारीला आता खऱ्या अर्थाने सुरुवात झाल्याचे चित्र दिसून आले.